## दिनांक :- २२/०५/२०२०

### १.भाग १ ते ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलम | ३६५/२०२० कलम ३२४, ५०४ भा.द.वि. |
| फिर्यादी नाव व पत्ता | महेंन्द नारायणराव गेडाम वय ४१ वर्ष रा. मिलचाळ नवी वस्ती बडनेरा |
| घटनास्थळ | रेल्वे पुला जवळ नवी वस्ती बडनेरा |
| घटना ता. वेळ | २०/०५/२०२० चे २१:४५ वाजता |
| दाखल ता. वेळ | २१/०५/२०२० चे ००:५२ वाजता |
| आरोपीचे नाव व पत्ता | संतोष एकनाथ शिन्दे वय ४० वर्ष रा. पाच बंगला नवी वस्ती बडनेरा |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे अमरावती येथुन मिलचाळ नवी वस्ती बडनेरा येथे जात असतांना यातील आरोपी ने दरूच्या नशेत रेल्वे पुलावर नवी वस्ती बडनेरा येथे त्यांना चाकुने मारहाण केली त्यामुळे त्यांना डाव्या पायाच्या मनगटावर जखम झाली तसेच त्याचे मागुन ठपचंद चंचनमत पंजवानी व शेख मुजाफर शेख नसीर दोन्ही रा. नवी वस्ती बडनेरा हे त्यांचे मोटार सायकलने आले असता त्यांना सुध्दा शिवीगाळ करून चाकुने मारहाण केली त्यामुळे ठपचंद याच डाव्या कपाडावर व शेख मुजाफर याला उजव्या खांदयाला मार लागला. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | पोउपनि प्रशांत जंगले पोलीस स्टेशन बडनेरा अमरावती शहर. |

### २.भाग १ ते ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलम | ३६६/२०२० कलम ३२४, ५०४ भा.द.वि. |
| फिर्यादी नाव व पत्ता | पुर्वत श्रीराम रामटेके वय ३१ वर्ष रा. परलाम ता.भातकुली जि.अमरावती |
| घटनास्थळ | फिर्यादीच्या घरासमोर , परलाम ता.भातकुली जि.अमरावती |
| घटना ता. वेळ | २१/०५/२०२० चे १३:३० वाजता |
| दाखल ता. वेळ | २१/०५/२०२० चे १५:३४ वाजता |
| आरोपीचे नाव व पत्ता | श्रीकृष्ण लक्ष्मण ढोके वय ३५ वर्ष रा. परलाम ता.भातकुली जि.अमरावती |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे घराच्या समोरील रोडवर उभे होते तेव्हा यातील नमुद आरोपीने फिर्यादीला दारू पिण्यासाठी पैसे मागितले असता फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ केली व हातातील लाकडी काठीने फिर्यादीच्या डोक्याच्या मागील बाजुने मारले त्यामुळे रक्त निघुन फिर्यादी हे गंभीर मार लागला. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व सर्टीफिकेट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | पोउपनि सुदाम आसोरे पोलीस स्टेशन बडनेरा अमरावती शहर. मो.नं. |

### ३.भाग १ ते ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप नं. ४८४/२०२० कलम ३२४,२९४,३४ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | पंकज मच्छिंद्र पानेकर वय २३ वर्ष, रा. सिध्दार्थ क्रीडा मैदान जवळ फ्रेजरपुरा अमरावती |
| घटनास्थळ | सिध्दार्थ क्रीडा मैदान जवळ फ्रेजरपुरा अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. २०/०५/२०२० चे २१.३० वा. |
| दाखल ता. वेळ | दि. २१/०५/२०२० चे ००.५८ वा. |
| आरोपी | १) रजनिश प्रल्हाद शेंडे , २) प्रफुल्ल डोंगरे दोन्ही रा. सद्धार्थ क्रीडा मैदान जवळ फ्रेजरपुरा अमरावती |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे कि, यातील नमुद फिर्यादी हा दि. २०/०५/२०२० रोजी दुपारी १३.३० वा जुवा खेळत असतांना नमुद आरोपी क्र. १ याने दोन वेळा पत्ते चुकीचे वाटले नंतर तिसऱ्या` वेळेस तो नमुद आरोपी क्र. १ रजनिश हा जिंकला त्यांमुळे नमुद फिर्यादी याने आरोपी क्र. १ यास म्हटले कि, तु दोन वेळा पत्ते चुकीचे वाटल्यामुळे तिसऱ्यांदा तुझी बाजी झाली असे म्हटले असता आरोपी ने फिर्यादी यास अश्लिल शिवीगाळ केली नंतर फिर्यादी ही घरी गेला नमुद घ. ता. वेळी व ठीकानी यातील फिर्यादी हा परत त्याचे घरासमोर उभा असता आरोपी क्र. १ हा फिर्यादी जवळ आला व त्याने म्हटले कि, तु मला दुपारी पत्ते चुकिचे वाटुन डबल पत्ते वाटले म्हणुन तु जिंकला असे का म्हटले या कारणावरुन नमुद क्र. १ याने फिर्यादीस अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन व हातातील लोखंडी कळे काढुन फिर्यादीच्या डोक्यावर मारले त्यामुळे रक्त निघाले तेवढ्यात आरोपी क्र. २ हा तेथे आला त्याने सुद्धा फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहान केली अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडी. सर्टि वरुन डी.ओ. सा. आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | स.पो. नि. बिपीन इंगळे पो.स्टे. फ्रेजरपुरा अम. शहर |

## ४.भाग १ ते ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप नं. ४८५/२०२० कलम ४९८ (अ), ३४ भादवी , सह कलम ४ मुस्लिम महीला (विवाहीच्या अधिकाराचे संरक्षण) कायदा २०१९ अन्वये |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| घटनास्थळ | शुक्रवार बाजार जवळ अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. २२/०२/२०२० चे ००.०० वा. ते दि. २५/०३/२०२० चे ००.०० वा. पर्यंत |
| दाखल ता. वेळ | दि. २१/०५/२०२० चे ११.४२ वा. |
| आरोपी | १) वसिम खान वल्द मोबीन खान , २) मोबीन अहमद खान (सासरे), ३) (आजीसासु), सर्व रा. कँम्प शुक्रवार बाजाराजवळ अमरावती |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी महीलेचे माहेर हे आष्टी येथिल असुन यातील नमुद आरोपी क्र. १ हा फिर्यादीचा पती असुन गडचिरोली न्यायालयात नोकरीवर आहे. यातील नमुद आरोपी क्र. १ याचे सोबत जाती रिवाजा प्रमाणे ेदि. २२/०२/२०२० रोजी फिर्यादी हीचे लग्ण झाले आहे. व त्यानंतर फिर्यीदी ही आरोपी क्र. १ याचे सोबत सासरी संसार करायला अमरावती येथे गेली असता आरोपी क्र. १ याने फिर्यादीस शारीरीक व मानसीक त्रास देणे सुरु केले तसेच आरोपी क्र. १ ची आजी आरोपी क्र. ३ हीने व आरोपी क्र. २ (सासरे ) हे सुद्धा फिर्यादीस शारीरीक व मानसीक त्रास देत. आरोपी क्र. १ हा फिर्यादीस मोबाईल सुद्धा वापरु देत नसे तसेच तुला लग्णात प्रेझऐंट कमी आले तु मला पसंत नाही माझ्या लायकीची नाही मी मोठा ऑफीसर आहे. असे बोलुन सतत शारीरक व मानसीक त्रास देत असत तसेच तु पाहायला चांगली नाही त्यामुळे तुझ्या माहेरचे लोक मला जास्त प्रेझंट देईल , गाडी देइल असे वाटले होते. तु आता तुझ्या वडीला कडुन गाडी आण किंवा गाडी साठी पैसे आण नाही तर मी तुला हाकलुन देईल असे सतत म्हणत असेे नमुद आरोपी हे फिर्यादीस नेहमी घर सोडुन जावे व स्वताचे जिवाचे कमी जास्त करावे या उद्देशाने त्रास देत असे फिर्यादी यांनी आरोपीतांचा सर्व त्रास सहन करुन संसार करण्याचा प्रयत्न केला. फि. ही आरोपी क्र. १ यांचे सोबत संसार करित असतांना दि. २५/०३/२०२० चे रात्री ०३.०० वा. आरोपी क्र. १ याने फिर्यादीस अचानक पणे मारहान केली. व गळा दाबुन जिवाने मारण्याचा प्रयत्न केला त्यामुळे फि. चे पायाला सुद्धा मार लागला व त्याच वेळी आरोपी क्र. १ याने आता तुझ्या सोबत संसार करायचा नाही तुला ठेवायचे नाही असे म्हणुन तीन वेळी तलाख, तलाख, तलाख असे म्हटले व तलाख दिला आरोपीचे अशा कृत्यामुळे फिर्यादी घाबरुन गेली. व तीची प्रकृती खराब झाली त्यानंतर आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे छायाचित्र त्याचे मोबाईल मध्ये काढुन ते लोकांना दाखविण्याची सुद्धा धमकी दिली. फिर्यादी यांचे कडे मोबाईल नसल्यामुळे झालेला सर्व त्रास फिर्यादी हे त्याचे आई वडीलांना सांगु शकली नाही दि. २९/०३/२०२० ला फिर्यादी यांना त्रास सहन होत नसल्याने फिर्यादीने तीची मावशी शिरीन खान हीला तीचे गाडीने सकाळी ०५.३० वा आष्टी येथे सोडुन मागीतले व आष्टी येथुन आरोपी क्र. १ यास फोन केला असता आरोपी क्र. १ याने म्हटलेेकि, आता आपले पती पत्नीचे नातेेराहीले नाही असे म्हटले अखेरी फिर्यादी यांनी हींमत करुन वरील सर्व त्रास आई वडील व भावाला सांगीतला सदर घटनेची तक्रार अमरावती पो.स्टे.ला जावुन देण्याची हींमत होत नसल्याने े पो.स्टे. आष्टी येथे तक्रार देत आहे नमुद आरोपीतांनी फीर्यादीचा शारीरीक व मानसीक छळ करुन आरोपी क्र. १ याने े तीन वेळी तलाख म्हणुन तलाख दिला आहे. असा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पो. स्टे. आष्टी येथे सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला सदर गुन्हा पो.स्टे. आष्टी, जि. वर्धा येथे दि. २४/०४/२०२० रोजी दाखल झालेला असुन घटनास्थळ हे पो.स्टे. फ्रेजरपुरा अम. शहर हद्दीतील असल्याने दि. २१/०५/२०२० रोजी Online FIR प्राप्त झाल्याने े सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | म.पो. उफ नि. ज्योती बळेगावे पो.स्टे. फ्रेजरपुरा अम. शहर . |

## ५.भाग ५ गुन्ह्याबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नागपुरी गेट |
| अप क्र. व कलम | १८३/२० कलम ३२४,२९४, ५०४,५०६,३४ भादवी |
| फिर्यादी नाव व पत्ता | शेख आसिफ शेख आमद वय-४० वर्ष रा.यास्मिन नगर अमरावती |
| घटनास्थळ | यास्मिन नगर अमरावती |
| घटना ता .वेळ | दिनांक २१/०५/२०२० चे १४.०० वा दरम्याण |
| दाखल .ता. वेळ | दिनांक २१/०५/२०२० चे २०.०० वा |
| आरोपी | १)परवेज खलीफा उर्फ पप्पु वय-२० वर्ष, २) मुक्कु वाहीदा गांजीवालीका लडका वय -२१ वर्ष ३) साजीद लगंडा वय -२० वर्ष सर्व रा.यास्मिन नगर अमरावती |
| हकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील नमुद फिर्यादी नमुद घटना ता वेळी व ठिकानी तिच्या बहिनीच्या घरासमोर उभे असनारे नमुद आरोपींना म्हटले असता तुम यहा पर मत खडे रहो वरुन दिनांक २१/०५/२०२० रोजी १४.०० वा नमुद आरोपीतांनी संगनमत करुन मुक्कु याने फिर्यादीचे जावयास डाव्या पायाचे घुटन्यावर चाकु मारुन जख्मी केले तसेच साजिद लगंडा याने फिर्यादीचे मांडीवर,जांगवर व डाव्या हाताच्या बोटावर व डुगंनावर चाकु मारुन जख्मी केले व त्याचे लहान भाउ आबीद ला साजिद ने त्याचे हाताचे बोटाला व मांडीवर जखमा केल्या तसेच परवेज खलीफा उर्फ पप्पु याने "तुम्हारी माँ कि चुत,तुम्हे देख लेता"अशी अश्लिल शिवीगाळ केली, सदर घटनास्थळी उपस्थितांनी भाडंन सोडविले व आरोपी पळुन गेले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला |
| तपास अधिकारी | ASI संजय बाळापुरे ब.न.६१७ पोस्टे नागपुरी गेट |

## ६.भाग ५ गुन्ह्याबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नागपुरी गेट |
| अप क्र. व कलम | १८१/२०२० कलम २७९,३३७ भादवी सह कलम १३४ मो.वा.का. |
| फिर्यादी नाव व पत्ता | गौरव विनोदराव राऊत वय २२ वर्षे,धंदा शिक्षण रा. ग्राम सुकळी अमरावती. |
| घटनास्थळ | अमोल कडु यांचे शेता जवळ सुकळी ते कुंड मार्ग अमरावती. |
| घटना. ता .वेळ | दि.२१/०५/२०२० चे ०५.३० वा ते ०५.४५ वा दरम्यान. |
| दाखल .ता. वेळ | दि.२१/०५/२०२० चे ०९.०७ वा . |
| आरोपी | टाटा ४०७ MH २८ ९९६८. हिरव्या रंगाचा |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे घटना ता वेळी व ठिकाणी आपले मित्रांन सह मॉनिग वॉक करीता गेले असता यातील एक हिरव्या रंगाचा टाटा ४०७ MH २८ ९९६८.च्या चालकाने ट्रक भरधाव वेगाने विरुध्द दिशेने अंगावर आणले फिर्यादी बाजुला हटल्याने फिर्यादीचे खांध्याला किरकोळ मार लागला ट्रक थांबिविण्याचे प्रयत्न केला परंतु थांबला नाही ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजी पणाने चालवुन फिर्यादीस जखमी करुन पळुन गेला तसेच मेडी सर्टी व जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | ASI विधाते ब.न.५८५ पोस्टे नागपुरी गेट अमरावती. |

## ७.भाग ५ गुन्ह्याबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नागपुरी गेट |
| अप क्र. व कलम | १८२/२०२० कलम १८८ भादवी सह कलम ५१(B) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ |
| फिर्यादी नाव व पत्ता | गणेश किसनराव कुत्तरमारे वय ५७ वर्ष, धंदा - व्यवसाय- नोकरी, रा. वुदांवन कॉलणी साई नगर अमरावती. |
| घटनास्थळ | इतवारा बाजार अमरावती. |
| घटना. ता .वेळ | दि.२१/०५/२०२० चे ०९.३० वा |
| दाखल .ता. वेळ | दि.२१/०५//२०२० चे १५.३६ वा |
| आरोपी | मोहम्म्द फहीम मोहम्मद रफीक रा. इतवारा बाजार अमरावती. |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की आज दि.२१/०५/२०२० रोजी यातील फिर्यादी यांनी लेखी रिपोर्ट सादर केला की सध्या शहरात संचार बंदी लागु असुन केरोना विषाणु चा प्रदुभाव रोखण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांचे आदेश क्रं कक्ष २७/कली/गुहविभाग/कावी/३४४/२०२० दि.१७/०५/२०२० चे उल्लंघन करुन नमुद आरोपीचे इतवारा बाजार मस्जिद चे बाजुला त्याचे दुकानाचे आज सकाळी ०९.३० वा कचोरी,समोसा इतर नास्ता विक्री करीत होते अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन व कुत्य कलम १८८ भादवी सह कलम ५१(B) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ प्रमाणे गुन्हयाची नोंद करुन सदर गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | पोउपनि लभाने पोस्टे नागपुरी गेट अमरावती. |

## ८.भाग १ ते ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | अप.न. ३४५/२०२० कलम ३२५,५०४ भा.द.वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | श्रीचंद नारायनदास घुडीयाल वय ६५ रा. दस्तुरनगर गल्ली क्र,१ अमरावती |
| घटनास्थळ | दस्तुरनगर अमरावती |
| घटना ता. वेळ | दि.१८/०५/२०२० चे २३.३०वा |
| दाखल ता. वेळ. | दि.२१/०५/२०२० चे १३.४२वा |
| आरोपी | एक महीला |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घ.ता.वेळी व ठीकानी फीर्यादी ही घरी हजर असता यातील नमुद महीला आरोपी हीने संपत्तीचे वादावरुन भांडन केले फीर्यादी व फीर्यादीचे भावास शिवीगाळ करुन फीर्यादीचे डाव्या हातावर लाकडी दांड्याने मारहान करुन जख्मी केले या बाबत फीर्यादीची मेडीकल तपासनी केली असता त्यामधे फीर्यादीचे डाव्या हाताचे बोट फँक्चर असल्याचे वैद्यकीय अधीकारी यांनी अभिप्राय दील्याने फीर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडी .सर्टी.वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अधिकारी | पो.उप.नि. डी.बी.नरवाडे पो.स्टे.राजापेठ अमरावती शहर |

## ९. भाग १ ते ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | खोलापुरी गेट |
| अप क्र. व कलम | अप. क्र. १८३/२०२० कलम ३६३ भा.द.वी. |
| फिर्यादि नाव व पत्ता | सुनिल लवकुश कुशवाह वय २२ वर्ष रा. रमेशसिंग ठाकुर यांचे वाडीत मद्रासी बाबा रोड हैदरपुरा अमरावती |
| घटनास्थळ | रमेशसिंग ठाकुर यांचे वाडीत मद्रासी बाबा रोड हैदरपुरा अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. २०/०५/२०२० चे २२/३० वा. |
| दाखल ता. वेळ | दिय २१/०५/२०२० चे ०२/३८ वा. |
| आरोपी | हिमांशु अजय साहु वय २० वर्ष रा. मसांनगज अमरावती |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीची बहीण कु. नेहा लवकुश कुशवाह वय १७ वर्ष ही रात्री १०/२० वा.दरम्यान फिर्यादी व घरातील मंडळी हे जेवन करण्या करीता बसले असता यातील फिर्यादी यांची बहीण नेहा हिने सर्वाना जेवन वाढले व जेवन झाल्या नंतर फिर्यादीचे वडील हे १०/३० वा . दरवाजा बंद करण्या करीता गेले असता कु नेहा ही घरात दिसुन आली नाही वरुन फिर्यादीने तिचा आजुबाजुला शोध घेतला असता ती मिळुन आली नाही. यातील नमुद ईसम हिमांशु साहु हा फिर्यादीचे घरी नेहमी येणे जाणे करीत होता. फिर्यादीच्या बहीणी सोबत बोलत होता वरुन याचेवर संशय असल्याने फिर्यादी हा नमुद ईसम हिमांशु अजय साहु वय २० वर्ष रा. मसांनगज अमरावती याचे घरी जावुन पाहीले असता तर घरी मिळुन आला नाही. व घर बंद दिसले फिर्यादीचा त्याच्यावर संशय असल्याने त्यानीच फिर्यादीच्या बहीणीला फुस लावुन पळवुन नेले असा सशंय आहे. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | स.पो.नि. ईंगळे साहेब पो.स्टे. खोलापुरी गेट अम. शहर |

## १०.भाग १ ते ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | सायबर अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | २८/२०२० कलम ४१९, ४२० भा.दं.वि. सहकलम ६६(क),६६(ड) माहिति तत्रंज्ञान कायदा |
| फिर्यादी | तेजस नितिन पारेख, वय ३० वर्ष, रा. विद्याभारती कॉलेज जवळ, कॅम्प रोड, अमरावती., धंदा- शिक्षक. |
| घटनास्थळ | विद्याभारती कॉलेज, अमरावती |
| घटना. ता .वेळ | दि.२०/०५/२०२० चे १६.०० ते १६.३० वाजता दरम्याण |
| दाखल .ता. वेळ | दि.२१/०५/२०२० चे १२.५० वाजता |
| आरोपी | मो.क्रं. +९१८३८८९०१८२१ |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमूद घटना ता.वेळी व ठीकाणी यातील फिर्यादीचे काकास नमुद मो.क्रं. ८३८८९०१८२१ चे धारकाने मुंबई मेन ब्रँच, बँक ऑफ बडोदा येथून अमित कुमार मिश्रा बोलत असल्याचे सांगुन फि.चे डेबिट कार्ड बंद पडणार असे सांगुन फि. चे अकाऊंटची संपुर्ण माहिती घेवून तसेच ओ.टी.पी. घेवून फिर्यादीचे बँक खात्यामधून ऑनलाईन ४९,९९६/-रु. काढून घेतले अश्या फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | पो.नी श्री.प्रवीण काळे पो.नी .पो.स्टे सायबर |

## १.भाग ६ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र.४८८/२०२० कलम २९४,५०६ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| घटनास्थळ | ग्राम पिंपळखुटा अर्मळ ता.जि.अमरावती |
| घटना ता. वेळ | दि.२१.०५.२०२० चे २१.०० वा |
| दाखल ता. वेळ | दि.२१.०५.२०२० चे २३.२५ वा |
| आरोपी | अंकित विलास दवाळे ` वय २८ वर्ष रा. .ग्राम पिंपळखुटा अर्मळ ता.जि.अमरावती |
| हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादि व आरोपी हे एकमेकांच्या घरासमोर राहत असुन आरोपी हा सतत दारु पिन्याच्या सवईचा असुन तो दारु पिउन कोनत्याही कारणावरुन फि.सोबत भांडन करीत असतो .नमुद घटणा ता.वेळी व ठिकाणी फि.हि तिचे मुलीसोबत जेवन करुन घराबाहेर फिरत असतांना फि.हा दारु पिउन त्यांचे घरासमोर आला व म्हणाला की, तु मले का हसली या कारणावरुन अश्लिल शिवीगाळ करुन फिर्यादिला पाहुन घेन्याची व मारन्याची धमकी दिली.अशा फिर्यादिचे जबानी रिपोर्ट वरुन व डि.ओ.सा.यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | ए.एस.आय.सुरेद्र ढोके ब.नं.६१८ पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती |

## १.प्रोव्हीबीशन

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलम | ३६७/२०२० कलम ६५ (ई) महा. दारूबंदी कायदा सहकलम १८८, २६९, २७० भादवि सहकलम ५१ (ब) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन काय्द्याप्रमाणे |
| फिर्यादी नाव व पत्ता | सरतर्फे नापोकॉ संतोष रामलाल यादव ब.नं. १८८ पोलीस स्टेशन बडनेरा अमरावती |
| घटनास्थळ | ग्राम दाभा जुना प्लॉट बडनेरा |
| घटना ता. वेळ | २१/०५/२०२० चे १८:०० वाजता |
| दाखल ता. वेळ | २१/०५/२०२० चे २१:१५ वाजता |
| आरोपीचे नाव व पत्ता | अमोल राहुल बोरकर वय ३२ वर्ष रा. ग्राम दाभा बडनेरा |
| हकीकत | सदर गुन्हयाची हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील जप्ती पंचनाम्यातील पंचा समक्ष नमद आरोपीवर प्रोव्हीशन रेड केला असता नमुद आरोपीचे ताब्यातुन एका पिवळया रंगाचे पिशवीमध्ये ८ नग देशी दारू बॉबी संत्रा प्रत्येकी १८० एम.एल च्या पावटया कि.अं. ४१६/— रूपयाचा माल घटनास्थळ जप्ती पंचनाम्यातील पंचा समक्ष जप्त करुन ताब्यात घेतलेला आहे. जप्त केलेल्या मालापैकी देशी दारू बॉबी संत्रा १८० एम.एल काचेच्या पावटी मध्ये सी.ए.सॅम्पल करीता वेगळी काढुन त्यावर आमचे,पंचाचे व आरोपींचे सहीचे कागदी लेबल लावुन जागीच लाखने सिल केले. नमुद आरोपीने मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे आदेश क्र.कक्ष— २७/कलि/गृह विभाग/कावि—३३५/२०२० दिनांक ०५/५/२०२० अन्वये जारी आदेशाचे उलघ्ंन केले. नमुद आरोपी इसमांचे कुत्य कलम ६५ (ई) महा. दारूबंदी कायदा सहकलम १८८, २६९, २७० भादवि सहकलम ५१ (ब) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन काय्द्याप्रमाणे होत असल्याने नमुद आरोपी विरूध्द सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | नापोकॉ संतोषयादव ब.नं. १८८ पोलीस स्टेशन बडनेरा अमरावती |

## २.प्रोव्हीबीशन

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र.४८६/२०२० कलम १८८,२६९,२७०, भादवी सहकलम ५१(ब) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा सन २००५ सहकलम ६५(ई) मदाका |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फे प्रो.पो.उप.नि.गजानन भानुदास सोनुने पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |
| घटनास्थळ | संजयगांधी नगर नं.२ अमरावती |
| घटना ता. वेळ | दि.२१.०५.२०२० चे १३.३० वा |
| दाखल ता. वेळ | दि.२१.०५.२०२० चे १६.५१ वा |
| आरोपी | सुनिल दंतोपंत आठवले वय ४७ वर्ष रा.संजयगांधी नगर नं.२ अमरावती. |
| हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फि.हे पो.स्टाफ सह स्वताचे वाहनाने पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमी दाराकडुन खबर मिळाली की, संजयगांधी नगर नं.२ अम.येथे एक ईसम त्याचे राहते घरासमोर अवैध्यरित्या ,विनापरवाना ,देशी दारुची विक्री करीत जवळ बाळगुन आहे .अशा माहीती वरुन नमुद घटणा ता.वेळी व ठिकाणी जावुन प्रो.रेड केला असता नमुद आरोपी हा देशी दारुची विक्री करीत असतांना मिळुन आला त्याचे ताब्यातुन पंचासमक्ष एका थैलित ६ नग देशी दारु चे १८० एम.एल पावट्याची कि.३०० रु.प्रोव्ही माल.जप्त करुन ताब्यात घेतला .सध्या कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखन्याकरीता मा.जिल्हाधिकारी सा. यांचा आदेश क्र.कक्ष -२७/कली /गृहविभाग /कावी -३४४/२० दि.१७.०५.२०२० अन्वये मनाई हुकुम जारी असतांना तसेच जा.फौ.कलम १४४ (१)(३) अन्वये सार्वजनिक ठिकाणी लोकांना एकेत्र जमवुन लोकांच्या जिवीतास कोरोना सारख्या रोगाचा प्रादुर्भाव वाढवुन लोकांच्या जिवीतास धोका निर्मान करन्याचे कृत्य केले व स्वताचे आर्थिक फायदयासाठी आदेशाचे उल्लघन केले .अशा फिर्यादिचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | ए.एस.आय.अरुण मेश्राम ब.नं.५८६ पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |

## ३.प्रोव्हीबीशन

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र.४८७/२०२० कलम १८८,२६९,२७०, भादवी सहकलम ५१(ब) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा सन २००५ सहकलम ६५(ई) मदाका |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फे स.पो.नि.बिपिन इंगळे पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |
| घटनास्थळ | पारधीबेडा वडाळी अमरावती |
| घटना ता. वेळ | दि.२१.०५.२०२० चे ` १९.४५ वा |
| दाखल ता. वेळ | दि.२१.०५.२०२० चे २२.५० वा |
| आरोपी | सुरेद्र भोसले (फरार ) रा.पारधीबेडा वडाळी अमरावती. |
| हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फि.हे`पो.स्टाफ सह स्वताचे`वाहनाने पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमी दाराकडुन खबर मिळाली की, .पारधीबेडा वडाळी अमरावती.येथे एक ईसम त्याचै राहते घरासमोर अवैध्यरित्या ,विनापरवाना ,गावठी हातभट्टीची दारु विक्री करीत जवळ बाळगुन आहे`.अशा माहीती वरुन नमुद घटणा ता.वेळी व ठिकाणी जावुन प्रो.रेड केला असता नमुद आरोपी स्वताचे घरात मोहासडवा हातभट्टीची गावठी दारु विक्री करीत विनापास परवाना बाळगलेला मिळुन आला व तो आम्हास पाहुन पळुन गेला. सध्या कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखन्याकरीता मा.जिल्हाधिकारी सा. यांचा आदेश क्र.कक्ष -२७/कली /गृहविभाग /कावी -३४४/२० दि.१७.०५.२०२० अन्वये आदेशाचे उल्लघन करुन अवैध्यपने विनापास परवाना गुन्ह्याचा प्रो.माल कब्जात घेवुन विक्री करीत असतांना बाळगलेला मिळुन आला व आम्हास पाहुन पळुन गेला ..अशा फिर्यादिचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | ए.एस.आय.सुरेद्र ढोके ब.नं.६१८ पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती |

## १.अकस्मात मृत्यु

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोस्टे राजापेठ |
| मर्ग क्र. व कलम | मर्ग न. २१/२०२० कलम १७४ जा.फौ. |
| फिर्यादीचे नाव व पत्ता | सरतर्फे पो.हे.का. निवासराव घुगे ब.न.७०६ पो.स्टे.राजापेठ अमरावती शहर |
| मृतकाचे नाव व पत्ता | रविकांत पुरषोत्तम पंत वय ६५ रा. साईनगर कक्कड लेआउट अमरावती |
| घटनास्थळ | साईनगर कक्कड लेआउट अमरावती |
| घटना ता. वेळ | दि.२०/०५/२०२० चे १२.१५वा |
| दाखल ता. वेळ | दि.२१/०५/२०२० चे १४.५३वा |
| मरणाचे कारण | राहते घरी चक्कर येवुन पडुन मृत्यु |
| हकीगत | हकीकत अशा प्रकारे आहे की इर्वीन पोलीस चौकी येथुन पो.स्टे.ला वायरलेस संच द्वारे माहीती मीळाली की मृतक नामे रविकांत पुरषोत्तम पंत वय ६५ रा. साईनगर कक्कड लेआउट अमरावती हा राहते घरी चक्कर येवुन खाली पडल्याने त्याला हजर शेजा-यांनी उपचारा करीता इर्वीन दवाखाना अमरावती येथे आनले त्याला डॉ.सा. यांनी तपासले व मृत घोषीत केले वरुन पी.एम. करुन पो.हे.क्र निवासराव घुगे ब.न. ७०६ सोबत पो.का. ब.न. १३९९ पो.स्टे.ला परत वरुन सदर चा मर्ग दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अंमलदार | पो.हे.का. निवासराव घुगे ब.न.७०६ पो.स्टे.राजापेठ अमरावती शहर |

## (२) अकस्मात मृत्यु

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोस्टे राजापेठ |
| मर्ग क्र. व कलम | मर्ग न. २२/२०२० कलम १७४ जा.फौ. |
| फिर्यादीचे नाव व पत्ता | सरतर्फे पोना/११७६ जितेंद्र थोरात,पो.स्टे.राजापेठ अमरावती शहर |
| मृतकाचे नाव व पत्ता | श्रीधर शांताराम सुतवाणे वय ५९ रा. गाणुवाडी,अमरावती |
| घटनास्थळ | गाणुवाडी,अमरावती |
| घटना ता. वेळ | दि.२१/०५/२०२० चे १०.०० वा |
| दाखल ता. वेळ | दि.२१/०५/२०२० चे २१.१९ वा |
| मरणाचे कारण | राहते घरी गळफास घेवुन मृत्यु |
| हकीगत | हकीकत अशा प्रकारे आहे की इर्वीन पोलीस चौकी येथुन पो.स्टे.ला वायरलेस संच द्वारे माहीती मीळाली की मृतक नामे श्रीधर शांताराम सुतवाणे वय ५९ रा. गाणुवाडी,अमरावती याने राहत्या घरी गळफास घेतली असता त्याला उपचारा करीता इर्वीन दवाखाना अमरावती येथे आनले त्याला डॉ.सा. यांनी तपासले व मृत घोषीत केले वरुन पी.एम. करुन पोना/११७६ व पोशि/१७० हे पो.स्टे.ला परत वरुन सदर चा मर्ग दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अंमलदार | पोना/११७६ जितेंद्र थोरात,पो.स्टे.राजापेठ अमरावती शहर |